N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. District (जिल्हा): पुणे ग्रामीण P.S.(ठाणे): शिरूर
FIR No.(प्रथम खबर क्र.): 0866 Year (वर्ष): 2026
Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):01/10/2026 09:31

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):
1. Day(दिवस): बुधवार
Time Period (कालावधी): पहर 7
Date From (दिंनाक पासून): 30/09/2026
Date To ( दिंनाक पर्यंत): 30/09/2026
Time From (वेळेपासून): 21:00 बजे
Time To (वेळेपर्यंत): 21:50 बजे

(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
Date (दिंनाक ): 01/10/2026 Time (वेळ): 09:09 बजे

(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):
Entry No. (नोंद क्र.): 013
Date & Time (दिंनाक आणि वेळ): 01/10/2026 09:09 बजे

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी
5. Place of Occurrence (घटनास्थळ):
1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
पूर्व, 1 किमी Beat No. (बिट क्र.):
(b) Address (पत्ता): जुन्या शिरुर पोलीस स्टेशन याठि,शिरूर

(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):
District(State) (जिल्हा(राज्य)):



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** आसावरी जगन्नाथ शेडगे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1990

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | पोलीस निरीक्षक,लाचलुचपत ,प्रतिंबधक विभाग पुणे,शिरूर,पुणे ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | पोलीस निरीक्षक,लाचलुचपत ,प्रतिंबधक विभाग पुणे,शिरूर,पुणे ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8425808058

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शिवाजी ज्योतीराम वनकर | | | 1. मुपोबनकरवाडी,ता इंदापूर जि पणे,इंदापूर,इंदापूर,पुणे ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि | सिम कार्ड ( मोबाईल फोन | एक सनडिस्क अल्ट्रा कंपनी 32 | 0.00 |



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| | इलेक्ट्रॉनिक सामान | मधील ) | जी.बी. चे मायक्रो एस.डी. कार्ड असुन त्याचे एका बाजुस SanDisk Ultra 32 | |
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | सिम कार्ड ( मोबाईल फोन मधील ) | एक सनडिस्क अल्ट्रा कंपनी 32 जी.बी. चे मायक्रो एस.डी. कार्ड असुन त्याचे एका बाजुस SanDisk Ultra 32 | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):

0.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

शिरूर पोलीस स्टेशन गुरनं 866/2026 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988चे कलम 7 अन्वये
फिर्यादी- मी आसावरी जगन्नाथ शेडगे,वय-36 वर्षे व्यवसाय नोकरी,पद-पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे मो.नं.8425808058.
आरोपी- शिवाजी ज्योतीराम बनकर वय 44 वर्षे पद पोलीस हवालदार ब.क्रं.2436 नेमणूक शिरुर पोलीस स्टेशन,पुणे ग्रामीण रा.रुम नं.101,स्वप्नपूर्ती निवास,गोलेगाव रोड,शिरुर ,पुणे मूळ गाव.मु.पो.बनकरवाडी ता.इंदापूर जि.पुणे
गु घ ता वे ठी- दिंनाक 30/09/2026 रोजी जुन्या शिरुर पोलीस स्टेशन याठिकाणी 21 .00 ते 21.50 वा चे दरम्यान
मिळाला माल- एक सॅनडिस्क अल्ट्रा कंपनी 32 जी.बी. चे मायक्रो एस.डी. कार्ड असुन त्याचे एका बाजुस SanDisk Ultra 32 GB micro SD U1 HCI C10 A1 व दुसरे बाजुस 5433DXCTQ088 BM MADE IN CHINA असे छापलेले (audio memory card )
एक सॅनडिस्क अल्ट्रा कंपनी 32 जी.बी. चे मायक्रो एस.डी. कार्ड असुन त्याचे एका बाजुस SanDisk Ultra 32 GB micro SD U1 HCI C10 A1 व दुसरे बाजुस 4525XF18203Q BM MADE IN CHINA असे छापलेले (video memory card )
हकीगत-.

मी आसावरी जगन्नाथ शेडगे,वय-36 वर्षे व्यवसाय नोकरी,पद पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे मो.नं.8425808058.

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे पोलीस निरीक्षक म्हणुन कार्यरत आहे.दि. 29/09/2026 रोजी 16.30 वा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे येथे हजर असतांना प्रशासन अधिकारी श्री. सतीश वाळके,पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी त्यांचे कार्यालयात बोलावून तक्रारदार दादाभाऊ देवराम गाडीलकर वय 29 वर्षे धंदा-शेती व कॉन्ट्रक्टर रा.टाकळी हाजी,तालूका-शिरुर जि.पुणे यांची लाच मागणी बाबत तक्रार असुन आपण त्यांची तक्रार ऐकुन पुढील कायदेशिर कारवाई करा असे आदेशित केले व मदतीकरीता पोशि 2845/विकास आडके,पोशि 9175/कुमकर, चालक पोहवा 6894/सोनवणे व शासकिय वाहन ईरटिगा गाडी क्र. एमएच 12 यूसी 4109 हे दिले असल्याचे सांगितले.तसेच सदर कारवाई करीता म्हाडा कार्यालय पुणे येथील पंच उपलब्ध करुन देण्यात आले. त्याना त्याची नावे विचारली असता त्यानी त्याची नावे 1) श्री.हरिदास लक्ष्मण जाधव वय 32 वर्षे,पद-कनिष्ठ लिपिक,म्हाडा,पूणे 2)वैभव भानुदास लाड वय 43 वर्षे पद सहायक म्हाडा,पूणे असे सांगितले.त्यानतर आम्ही पंच,तक्रारदार व सापळा पथकास आमच्या कक्षात घेवून येवून पंचाची , तक्रारदार यांची



Scanned with OKEN Scanner

एकमेकांना ओळख करुन दिली तसेच सापळा पथकाची ओळख करुन दिली.त्यानंतर तक्रारदार यांना पंचासमक्ष त्यांची तक्रार विचारली असता त्यांनी त्यांची तक्रार सांगितली व स्वतहस्ताक्षरात लिहलेली तक्रार देखील दाखविली. ती पुढीलप्रमाणे

" मी दादाभाउ देवराम गाडीलकर वय 29 वर्षे धंदा-शेती व कॉन्ट्रक्टर रा.टाकळी हाजी,तालूका-शिरुर जि.पुणे मोनं.9011657085 असुन नमुद पत्यावर माझे कुटुंबासह राहण्यास आहे.माझी टाकळी हाजी गावात गट नं 1225 मध्ये 8 एकर वडीलोपार्जित शेती माझे वडील नामे देवराम लक्ष्मण गाडीलकर व आई नामे सखूबाई देवराम गाडीलकर यांचे नावे असून सदर शेती करुन मी माझ्या कुंटूबाचा उदरनिर्वाह करतो.गट क्रं 1225 याठिकाणी माझे आमचे शेताच्या शेजारीच माझे चूलते नामे विष्णू लक्ष्मण गाडीलकर व चूलती नामे निर्मला विष्णू गाडीलकर यांच्या नावावर देखील 8 एकर शेतजमीन आहे.माझे चूलते व आमच्यात जमीन वाटपावरुन व वहिवाटीवरुन पूर्वीपासून वाद सूरु आहेत.

गट नं 1225 येथील सामाईक जमिनीवरुन चूलते विष्णू गाडीलकर व माझ्यात वाद सुरु असल्याने मी चूलते विष्णू गाडीलकर यांचे विरोधात शिरुर पोलीस स्टेशन येथे चूलते विष्णू गाडीलकर यांचे विरोधात दि. 27/2/2026 रोजी व दि.24/8/2026 रोजी अर्ज दिला आहे.माझे चूलते विष्णू लक्ष्मण गाडीलकर यांनी देखील दिंनाक 18/7/2026 रोजी माझ्याविरोधात तसेच माझे आईवडीलांच्या विरोधात गट नं 1225 येथील सामाईक जमिनीबाबत शिरुर पोलीस ठाणेत अर्ज दिला आहे.माझे चूलते विष्णू गाडीलकर यांनी दिलेल्या अर्जावरुन चौकशीअंती चूलती निर्मला विष्णू गाडीलकर यांच्या फिर्यादिवरुन माझ्याविरोधात तसेच माझे आईवडीलांच्या विरोधात दि.11/09/2026 रोजी शिरुर पोलीस ठाणेत गु.र.क्रं 805/2026 कलम 329(3),324(4),3(5) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास पो हवा शिवाजी बनकर बं.नं.2436 यांच्याकडे आहे.दिंनाक28/9/26 रोजी पोलीस हवालदार बनकर यांनी मला फोनकरुन शिरुर पोलीस ठाणेत आईवडीलांना घेवून चौकशीकामी बोलाविले.तेव्हा मी आईवडीलांना घेवून शिरुर पोलीस ठाणेत गेलो असता पोहवा बनकर यांनी माझ्या तसेच माझ्या आईवडीलांच्या विरोधात दाखल असलेल्या गुन्हयात अटक न करता नोटीस देवून सोडण्यासाठी तसेच गुन्हयात मदत करण्यासाठी माझ्याकडे 15000/- रुपयाची मागणी केली.तसेच नोटीसवर माझी तसेच आईवडीलांची सही घेतली व 15000/-रुपये दिल्युनतर नोटीस देण्यात येईल असे म्हणाले तेव्हा मी अटकेच्या भीतीने पोलीस हवालदार बनकर यांना 5000/-रुपये रोख रक्कम दिली. तेव्हा पोहवा बनकर यांनी मला उर्वरीत 10000/-रुपये दि.29/09/2026 रोजी घेवून बोलाविले आहे.तरी पोहवा बनकर मागत असलेली रक्कम हि लाचेची रक्कम असल्याची माझी खात्री झाली असून मला त्यांना लाच देण्याची मूळीच इच्छा नाही.पोहवा शिवाजी बनकर यांचेशी माझे कोणतेही वादविवाद नसून आर्थिक हिंतसबंध नाहीत.तरी पोहवा शिवाजी बनकर यांचेविरोधात कारवाई होण्यास माझी कायदेशीर तक्रार आहे." अशा मजकूराची तक्रार दिंल्यानतर पंच व आम्ही तक्रारदार यांनी दिलेली लेखी तक्रार वाचून त्यावर सहया केल्या.त्यानंतर आम्ही पंचाना आपण पंच साक्षीदार म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का अशी विचारणा करता त्यास नमुद दोन्ही पंच साक्षीदार यांनी होकार दिला.त्यानंतर तक्रारदार हे त्यांचेकडील वाहन कार एम.एच.12डब्लू.झेड.3529 याने व आम्ही वर नमुद शासकिय वाहनामधुन पडताळणी व सापळा कारवाईकामी लागणारे साहित्य घेवून लाचलुचपत प्रतिबधक कार्यालय पुणे येथून बाहेर पडुन साधूवासवानीचौक-बंडगार्डन ब्रीज-येरवडा वाघोली मार्ग कैलास हॉटेल शिरुर च्या बाजूच्या मोकळया जागेत कोणासही संशय येणार नाही अशाठिकाणावर 20.30 वाजता पोहचलो.

त्यानंतर पूढील पडताळणी कारवाई लगेच करण्याचे ठरवून आम्ही तक्रारदार यांना शासकिय वाहनात बसवले. सदर पडताळणी कारवाई दरम्यान पंच क्र.1 म्हणुन श्री.हरिदास जाधव, व पंच क्र. 02 म्हणुन श्री.वैभव लाड हे काम करतील असे आम्ही ठरविले.त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचास शासकीय व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याबाबत माहीती दिली.एक नवीन सिंलबद मेमरी कार्ड त्याचे वेस्टनातुन बाहेर काढुन त्याची सर्वासमक्ष पाहणी केली असता,सॅनडिस्क अल्ट्रा कंपनी 32 जी.बी. चे मायक्रो एस.डी. कार्ड असुन त्याचे एका बाजुस SanDisk Ultra 32 GB micro SD U1 HCI C10 A1 व दुसरे बाजुस 5433DXCTQ088 BM MADE IN CHINA असे छापलेले असल्याचे दिसुन आले.मेमरीकार्ड त्यांचे वेस्टनातून बाहेर काढले ते व्हाईस रेकॉर्डरमध्ये घातले. इनबिल्ट मेमरीमध्ये व मेमरीकार्डमध्ये यापूर्वीची कोणतीही फाईल नसल्याचे पंच व तक्रारदार यांना खात्री करुन दिली.तसेच निवेदन व सापळा कारवाईचे चित्रीकरण पोशि कुमकर हे सोनी कंपनीचा शाशकिय व्हिडीओ कॅमेरा यामध्ये करणार असलेचे सांगुन त्याकरिता वापरण्यात येणारे नवीन मेमरी कार्ड दाखविले असता ते सॅनडिस्क अल्ट्रा कंपनी 32 जी.बी. चे मायक्रो एस.डी. कार्ड असुन त्याचे एका बाजुस SanDisk Ultra 32 GB micro SD U1 HCI C10 A1 व दुसरे बाजुस 4525XF18203Q BM MADE IN CHINA असे छापलेले असल्याचे दिसुन आले. सदर मेमरी कार्ड शासकिय व्हिडीओ कॅमे-यामध्ये बसविले व त्यामध्ये पुर्वीचे कुठलेही चित्रीकरण

नसल्यांची खात्री करुन दिली.त्यानंतर तक्रारदार दादाभाउ गाडीलकर यांचे निवेदन घेऊन त्यापाठोपाठ पंच क्र. 1 व 2 यांचे निवेदन घेवून व त्याची व्हिडीओरेकॉर्डीग केले ती वेळ वा 21.00 होती त्यानंतर तक्रारदार यांना पंच क्रं 1 हरिदास जाधव यांचेसह लोकसेवक पोहवा बनकरयांची भेट घेण्याकरीता त्यांची कार वाहन क्रं एम.एच.12 डब्लू. झेड. 3529 यावरुन शिरुर पोलीस ठाणेत रवाना करण्यात आले ती वेळ 21.25 वा होती.

त्यानंतर थोडया वेळाने तक्रारदार व पंच क्रं 1 हे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले ती वेळ 22.06 वा ची होती. सदर वेळी व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन आम्ही पंच क्रं 1 यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले असे विचारले असता,पंच क्र. 01 श्री.जाधव यांनी सांगितले कि, "मी व तक्रारदार श्री.गाडीलकर असे त्यांचे चारचाकी वाहनामधुन नवीन शिरुर पोलीस स्टेशन येथे गेलो तेथे पोहवा बनकर यांचेबाबत विचारणा केली असता त्यांनी पोहवा बनकर पोलीस स्टेशनमध्ये नसलेबाबत सांगितले म्हणून तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलचा स्पीकर ऑन करुन त्यांचे मोबाईल नंबर- 9011657085 यावरुन लोकसेवक बनकर यांचे मोबाईल क्रमांक- 9518942213 यावर व्हाटसअप कॉल केला असता लोकसेवक बनकर यांनी तक्रारदार यांना जुन्या शिरुर पोलीस स्टेशन जवळ येण्यास सांगितले व फोन कट केला.

त्यानंतर मी व तक्रारदार श्री.गाडीलकर असे जुन्या शिरुर पोलीस स्टेशनचे समोर जावुन पोलीस स्टेशचे आवारात जावुन थांबलो असता काही वेळाने एक इसम सदरठिकाणी आला तेव्हा तक्रारदार यांनी मला खूनवून ते लोकसेवक बनकर असल्याचे सांगितले.त्यावेळी तक्रारदार श्री.गाडीलकर व लोकसेवक बनकर यांच्यामध्ये तक्रारदार यांचे कामा संदर्भात चर्चा झाली त्यावेळी तक्रारदार श्री.गाडीलकर हे लोकसेवक बनकर यांना "अटकपुर्व हा ती कागदपत्र तयार नव्हती ट्रॅक्टर ची ...म्हणलं नंत्यावर कॉर्टार सोडायचं कसंना...आपलं इकडं आपलं एक मिनीटं... नाय तरती असली की मला घ्यायची ठेवुन ती मंग मी गेलो सकाळी ती एजेंट हाताला धरुन रुपया चे तीथं दहा रुपये देवुन तवा ती करुन घेतलं कागदपत्र..आणि वडीलांना अन ती भावाल यांना बोलावलं इथं...वकीलांना म्हटलं त्यांनी घेतलं काय तरी पण आजुन झालं नाही...अटकपुर्व" असे म्हणाले त्यावर लोकसेवक बनकर हे "होईल...होईल उदया...दोन दिंवसात..." असे म्हणाले त्यावर तक्रारदार हे "किती काय"असे म्हणाले असता लोकसेवक बनकर हे "करा व्यवस्थित काय"त्यावर तक्रारदार हे "तुम्ही मला वाटतय काय पंधरा म्हणले होते..."त्यावर लोकसेवक हे "हा " म्हणाले त्यावर तक्रारदार हे " त्याच्यातलं काल कायतरी पाच दिलं वाटतयं...पाच दिलतना ..."त्यावर लोकसेवक बनकर हे "चार...चार दिलत" असे म्हणाले त्यावर तक्रारदार हे लोकसेवक यांना "ह..काय झालं...हा काल चार दिलत मला काय आठवण झालय पण असंच काय चार पाच दिलत ..." असे म्हणाले असता लोकसेवक बनकर हे तक्रारदार यांना "त्याना थांबु दया साईडला"(मला उद्देशुन) असे म्हणाले त्यावर मी तक्रारदार व लोकसेवक हे थांबलेल्या ठिकाणाहुन थोडं साईडला येवुन थांबलो तेव्हा तक्रारदार व लोकसेवक बनकर यांचेमधील संभाषण मला ऐकु येत होते. त्यानंतर तक्रारदार श्री.गाडीलकर व लोकसेवक बनकर यांचेमध्ये कामासंदर्भात इतर चर्चा होवुन तक्रारदार हे लोकसेवक बनकर यांना "अवघड ये पण आता काय करणार ये सांगा ना तुम्ही...वडीलांना आणु सोबत का मी घेवुन येवु...किती आणु मी...अकरा आणुका अजुन का..."असे म्हणाले त्यानंतर काही वेळ पुन्हा तक्रारदार व लोकसेवक बनकर यांचे मध्ये कामासंदर्भात झाली त्यानंतर तक्रारदार हे लोकसेवक बनकर यांना "येवू का जावुन तवरं...तुम्ही त्याची पीडीएफ वगैर बनवा आलोच" असे म्हणाले त्यानंतर मी व तक्रारदार सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. त्यानंतर पोनि शडगे यांनी तक्रारदार यांना देखील रवाना केल्यापासुन परत येईपर्यंत काय घडले याबाबत विचारणा केली असता तक्रारदार श्री.गाडीलकर यांनी देखील पंच क्र. 01 जाधव यांचेप्रमाणे हकिकत सांगितली.त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील फाईल ध्वनिमुद्रीत फाईल क्र.02 फास्ट फारवर्ड करुन ओपन स्पीकर करुन दोन्ही पचासमक्ष ऐकली असता सदर संभाषण तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेल्या हकिकतेप्रमाणे बरोबर असल्याची खात्री केली.

एकंदरित दि.29/9/26 रोजीच्या पडताळणी कारवाई दरम्याण लोकसेवक बनकर यांनी तक्रारदार व त्यांचे आईवडीलांना गुन्हयात अटक न करता नोटीस देवून सोडण्यासाठी तक्रारदाराकडे 15000/-रुपये लाचेची मागणी केल्याचे व तक्रारदार यांचेकडून 4000/-रुपय स्विकारले असल्याचे मान्य करुन तक्रारदार यांचेकडे उर्वरीत 11000/-रुपयाची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने आम्ही पुढील सापळा कारवाई आजमविण्याच्या अनुषंगाने तक्रारदार यांना लाचेची रक्कम हजर करण्यास सांगितली असता तक्रारदार यांनी त्यांचेकडे लाचेची रक्कम उपलब्ध नसल्याचे सांगितले व लाचेच्या रक्कमेची जूळवाजूळव करण्याकरीता सापळा कारवाई दि.30/9/26 रोजी करण्याची विंनती केलेवरुन आम्ही पुढील सापळा कारवाई हि दि.30/09/2026 रोजी करण्याचे ठरविले.तसेच लोकसेवक बनकर यांना सदरबाबत फोनद्वारे माहिती देण्याचे ठरवून कॉल रेकॉर्डवर घेण्याचे ठरविले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लोकसेवक बनकर यांना कॉल करण्यास सांगितले व रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांचे मोबाईल समोर धरला ती वेळी 23:07 वा ची होती. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलचा स्पीकर ऑन करुन त्यांचा



Scanned with OKEN Scanner

मोबाईल नंबर- 9011657085 यावरुन लोकसेवक बनकर यांचे मोबाईल क्रमांक- 9518942213 यावर व्हॉटस अप कॉल केला असता लोकसेवक बनकर यांनी तक्रारदार यांचा फोन उचलला त्यावेळी तक्रारदार श्री. गाडीलकर हे लोकसेवक बनकर यांना "हा साहेब थांबलेत का गेले घरी"म्हणाले त्यावर लोकसेवक बनकर हे "आता घरी आलतो तुमची वाट बघुन" त्यावर तक्रारदार हे लोकसेवक बनकर यांना "ती कायं झालंयं मी आलो इथं पाहुण्यां पाशी पण वडील वाट बघुन ..गावातलं कोण तरी भेटलं त्यांना ती गेले घरी निघुन ..पाहुणी म्हणली जेवुन जा...मग जेवत थांबलो होतो मी" त्यावर लोकसेवक बनकर हे " बर.." असे म्हणाले त्यावर तक्रारदार हे लोकसेवक बनकर यांना "म्हणलं साहेबांना सांगावं ... उदया येतोना सकाळं ..सकाळं..".त्यावर लोकसेवक बनकर हे "बरं...बरं ठिंकय ..ठिंकय..."असे बोलले.

त्या◌ानंतर आम्ही दि.29/9/26 र◌ाजीची पडताळणी कारवाइ स्थगित करुन पुढील सापळा कारवाई दि. 30/09/2026 रोजी करण्याचे ठरवून सदरबाबत पंचाना ,तक्रारदार व सापळा पथकास दि.30/9/2026रोजी लाप्रवि कार्यालय पुणे येथे सकाळी 9.00 वाजता हजर राहण्याच्या तसेच गोपनीय बाळगण्याच्या सुचना दिल्या. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

आम्ही दिलेल्या सुचनेप्रमाणे दि.30/09/2026 रोजी दोन्ही पंच व सापळा पथक असे सकाळी 9.00 वाजता ला.प्र.वि.पुणे कार्यालय येथे हजर झाले.त्यानंतर प्रशासन अधिकारी पोलीस उपअधिक्षक सतीश वाळके यांनी आम्हाला त्यांचे कार्यालयात बोलावून सांगितले कि,तक्रारदार यांना लोकसेवक बनकर यांनी सकाळी 10.35 वा च्या सूमारास फोन करुन सायंकाळी 16.00 नंतर बोलाविले असलेबाबत सांगितले आहे.त्यामूळे आम्ही पूढील कारवाई हि सायंकाळी 16.00 नंतर करण्याचे ठरवून सदरबाबत पंचाना व सापळा पथकास सुचना दिल्या.त्यानंतर 15.00 वा आम्ही सापळा पथकासह सापळा कारवाईकामी आवश्यक असलेल्या साहित्यासह ला.प्र.वि.पुणे कार्यालयातुन शासकीय वाहन क्र.एमएच 12 यूसी 4109 ने रवाना होवून साधुवासवाणी चौक-बंडगार्डन ब्र◌ीज-येरवडा वाघोली मार्गे रांजनगाव एमआयडीसी येथे 16.45 वा पोहचून आडोशाला थांबून तक्रारदार यांना फोन करुन कळविले.त्यानंतर तक्रारदार हे त्यांचे चारचाकी वाहन क्र.एम.एच.12डब्लू.झेड.3529 याने सदरठिकाणी हजर झाले.सदर ठिकाणावरुन पुढील कारवाई करण्यास अंतर जास्त पडत असल्याने तक्रारदार हे त्यांचे वाहनासह व आम्ही सापळा पथक शासकिय वाहनातून शिरुर स्मार्ट बाजार पार्किंग शेजारील मोकळ्या जागेत जावून थांबलो व सदरठिकाणाहून पुढील सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरवून तक्रारदार यांना शासकिय वाहनात घेतले व आम्ही तक्रारदार, पंच साक्षीदार व सापळा पथक यांना सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या.

त्यानंतर आम्ही शासकीय व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये दि.29/09/2026 रोजीचे पडताळणी कारवाई दरम्यान वापरण्यात आलेले मेमरीकार्ड पुढील सापळा कारवाई करीता सलग वापरण्यात येणार असल्याचे सांगुन त्यामध्ये दि.29/09/2026 रोजीच्या ध्वनिमुद्रीत झालेल्या 3 फाईल व्यतिरिक्त इतर कोणतीही फाईल नसल्याची दोन्ही पंचांची व तक्रारदार यांची खात्री करुन दिली.त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांसमक्ष तक्रारदार गाडीलकर यांना लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी त्यांचेकडील 500/- रुपये दराच्या भारतीय चलनाच्या 22 नोटा असे एकूण 11000/-रुपये हजर केले.सदर नोटांचे नंबर कागदावर लिहुन काढले त्यावर आम्ही व पंचांनी सहया केल्या.त्यानंतर तक्रारदार यांना ग्रामीण भाग असल्याने सापळा कारवाईकरीता एक दूचाकी उपलब्ध करण्यास सांगितली असता तक्रारदार यांनी मोटारसायकल क्रं एमएच 12 एसी 0622 हि उपलब्ध करुन दिली.त्यानंतर आमचे सुचनेवरुन चालक पे◌ाहवा सोनवने यांनी तक्रारदार व पंचाना अ◌ॅन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावून सांगुन व त्याचे प्रात्यक्षिक करुन दाखवून सदर नोटांना अ◌ॅन्थ्रासीन पावडर लाऊन नोटा तक्रारदार यांच्या पॅन्टच्या पाठीमागील उजव्या खिशात ठेवल्या.त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लोकसेवक बनकर यांची भेट घेण्यासाठी रवाना करण्याचे ठरवून व्हॉईस रेकॉर्डर 20.12 वाजता चालू करुन त्यामध्ये तक्रारदार,पंच क्र.1 श्री.जाधव व पंच क्र.2 श्री.खाडे यांची सापळा निवेदन ध्वनिमुद्रीत केले व त्याचे व्हिडीओ चिञीकरण केले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं 1 यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने सूचना देवून व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन लाऊन देऊन तक्रारदार यांना लाच रक्कमेसह पंच क्रं 1 जाधव यांचेसह तक्रारदार यांच्या चारचाकी वाहनाने 21.10 वा रवाना केले. त्यांचे पाठोपाठ दूचाकी क्र एमएच 12 एसी 0622 वरुन पोशि आडके,पोशि यांना रवाना केले.त्यांचे पाठोपाठ आम्ही उर्वरित सापळा पथक व पंच क्रं 2 यांचेसह शासकीय वाहनाने शिरुर पोलीस स्टेशनकडे रवाना झालो.तक्रारदार हे शिरुर पोलीस स्टेशन च्या आवारात गेल्यानंतर आम्ही सापळा पथक हे कोणासही संशय येणार नाही व तक्रारदार व पंच क्रं 1 दिसतील अशा बेताने शिरुर पोलीस स्टेशनच्या आवारात थांबून राहिलो.काही वेळाने तक्रारदार हे पंच क्रं 1 याचेसह त्यांच्या चारचाकी वाहनाने जुने शिरुर पोलीस स्टेशनच्या दिशेने जाताना दिसल्याने आम्ही सापळा पथक तक्रारदार यांचे पाठोपाठ रवाना झालो तक्रारदार यांनी त्यांचे वाहन जुने शिरुर पोलीस स्टेशन याठिकाणी नेवून थांबिविले असता आम्ही उर्वरीत सापळा पथक कोणासही संशय येणार नाही अशा बेताने व तक्रारदार पंच क्रं 1

Scanned with OKEN Scanner

दिसतील अशा अंतरावर थांबून राहिलो.तेव्हा तक्रारदार हे जूने शिरुर पोलीस स्टेशन मध्ये पंच क्र 1 यांचेसह आतमध्ये गेले.काही वेळाने पोलीस स्टेशनच्या बाहेर एक इसम मोटरसायकल क्र.एमएच 12 जीजे 0594 वरुन येवून थांबल्याचे आम्ही पाहिले. त्यानंतर तक्रारदार पंच क्र 1 यांचेसह पोलीस स्टेशनच्या बाहेर येवून सदर इसमासोबत बोलू लागले.तेव्हा पंच क्र 1 हे तक्रारदार यांच्या शेजारीच असलेल्या तक्रारदार यांच्या गाडीत जावून बसल्याचे आम्ही पाहिले. काही वेळाने तक्रारदार यांनी आम्हाला त्यांचे तोंडावरुन रुमाल फिरवून लाच रक्कम स्विकारलेचे पुर्व नियोजीत इशारा केला असता पोशि कूमकर ,पोशि आडके तसेच आम्ही सापळा पथक त्याठिकाणी पोहचलो.त्यावेळी तक्रारदार यांनी दाखविल्याप्रमाणे सदर इसमास आम्ही ताब्यात घेतले.सदर वेळी पोशि आडके यांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेऊन बंद केला ती वेळ 21.33 वा ची होती.सदर वेळी पोशि कूमकर यांनी व्हिडीओ रेकॉर्डीग सुरु केले.

त्यानंतर पंच क्र.01 यांना लाचेच्या रक्कमेबाबत विचारले असता पंच क्र 01 यांनी सांगितले कि लोकसेवक बनकर यांनी लाचेची रक्कम देण्याबाबत तक्रारदारांना हाताने ईशारा केल्याने तक्रारदारांनी लाचेची रक्कम त्यांच्याकडे दिली असून ती त्यांनी पँटच्या डाव्या खिशात ठेवली असल्याचे मी पाहिले.तेव्हा आम्ही सदर इसमास त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव शिवाजी ज्योतीराम बनकर वय 44 वर्षे पद पोलीस हवालदार ब.क्र.2436 नेमणूक शिरुर पोलीस स्टेशन,पुणे ग्रामीण रा.रुम नं.101,स्वप्नपूर्ती निवास,गोलेगाव रोड,शिरुर ,पुणे मूळ गाव.मु. पो.बनकरवाडी ता.इंदापूर जि.पुणे असे सांगितले.त्यानंतर लोकसेवक बनकर हे आरडाओरड करु लागल्याने पंच क्रं 1 यांना लोकसेवक बनकर यांच्या खिशातून लाचेची रक्कम काढण्यास सांगितली असता पंच क्रं 1 यांनी लोकसेवक बनकर यांच्या पॅन्टच्या डाव्या खिशातून लाचेची रक्कम काढली त्यानंतर पंच क्रं 2 यांनी सदर नोटांचे सापळापुर्व कारवाई दरम्यान कागदावर लिहून ठेवलेल्या नोटांच्या नंबरशी खात्री केली असता तंतोतंत जुळून येवुन संपूर्ण 11000/-रुपयाची सापळा रक्कम असल्याचे निष्पन्न झाले.त्यानंतर आमचे सुचनेवरुन लोकसेवक बनकर यांना शासकिय वाहनात घेऊन कृत्रीम अंधार करुन अल्ट्राव्हॅायलेट दिव्याच्या सहाय्याने लोकसेवक बनकर यांचे दोन्ही हाताची तपासणी केली असता त्यांच्या दोन्ही हाताला अँन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली.तसेच लाचेची रक्कम तपासली असता लाचेच्या रक्कमेवर देखील फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर लोकसेवक यांच्या पॅटच्या डाव्या खिश्याची तपासणी केली असता सदरठिकाणी फिक्क्ट निळसर रंगाची चकाकी दिसून आली त्यानंतर पंच क्र.1 श्री.जाधव यांचे हातास अॅन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली कारण त्यांनी सापळा यशस्वी झालेनंतर लाच रक्कम लोकसेवकाकडुन ताब्यात घेतली होती. त्यानंतर तक्रारदार यांचे हात व पॅन्टची तपासणी केली असता तक्रारदार यांच्या उजव्या हाताला व पॅन्टच्या मागील उजव्या खिशाला ही फिक्क्ट निळसर रंगाची चकाकी दिसून आली.त्यानंतर आम्ही तक्रारदार व सापळा पथकासह लोकसेवक बनकर यांना घेवून नवीन शिरुर पोलीस ठाण्यात आलो त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.गाडीलकर यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले कि,मी व पंच क्रं 1 असे लोकसेवक बनकर यांना भेटण्याकरीता नवीन शिरुर पोलीस ठाणेत गेलो असता तेथे लोकसेवक बनकर नसल्याने मी त्यांना मोबाईलचा स्पीकर ऑन करुन व्हाटसअप कॉल केला असता त्यांनी मला जूने शिरुर पोलीस स्टेशन येथे येण्यास सांगितले.तेव्हा मी पंच क्रं 1 यांचेसह माझ्या कारने जूने शिरुर पोलीस स्टेशन येथे जावून लोकसेवक यांना मोबाईलचा स्पीकर ऑन करुन व्हाटसअप कॉल करुन जूने शिरुर पोलीस स्टेशन येथे आलो असल्याचे सांगितले असता त्यांनी मला पोलीस स्टेशनच्या बाहेर येण्यास सांगितले.मी पंच क्र 1 यांचेसह बाहेर आलो असता लोकसेवक बनकर हे त्याठिकाणी होते तेव्हा मी त्यांना “तुम्ही सांगितल्याप्रमाणे तुमचे आकरा हजार आणले....आता पहिले चार चार आणुन दिले...”असे म्हणालो तेव्हा लोकसेवक बनकर हे पंच क्रं 1 यांना उद्देशून “ अ त्यांना जाउदे आतमध्ये...तुम्ही बसा” असे म्हणाले असता पंच क्रं 1 तिथेच शेजारी असलेल्या माझ्या गाडीत जावून बसले तेव्हा लोकसेवक बनकर यांनी मला हाताने पैसे देण्याबाबत ईशारा केला असता मी त्यांना लाचेची रक्कम दिली. व लोकसेवक बनकर यांना “अ दिले...मला मला वाटलं पाच दिलेत आणि तूम्हाला वाटलं मी तुम्ही म्हंटले चार दिलेत....म्हंजे असा घोळ नको व्हायला ...चारं हजारचा..”असे म्हणालो असता लोकसेवक बनकर हे मला “नोटीस पाठवतो तुम्हाला लगेच...”असे म्हणाले तेव्हा मी त्यांना “हा अकरा हजारेत हे ...नोटीस दया पाठवून फक्त” असे म्हणालो त्यानंतर मी सापळा पथकास लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यानंतर सापळा पथकाने त्यांना ताब्यात घेतले अशी हकिकत दोन्ही पंचासमक्ष सांगीतली. त्यानंतर पंच क्र. 1 श्री. जाधव यांना घडलेला घटनाक्रम विचारला असता, त्यांनी तक्रारदार यांचेप्रमाणेच हकिकत सांगितली. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी तक्रारदार दादाभाऊ देवराम गाडीलकर यांनी दि 20/09/20..

Scanned with OKEN Scanner

आलेल्या पडताळणी कारवाई दरम्याण लोकसेवक पोहवा शिवाजी बनकर ब.क्र2436 यांनी तक्रारदार व त्यांचे आईवडील यांचेविरोधात शिरुर पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गुन्हयात तक्रारदार व त्याचे आईवडीलांना अटक न.करता नोटीस देवून सोडण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे 15000 हजार रुपये लाचेची मागणी केल्याचे तसेच तक्रारदार यांचेकडून 4000 हजार रुपये स्विकारल्याचे मान्य करुन तक्रारदार यांचेकडे 11000 हजार रुपये लाचेची मागणी करुन दि.30/9/26 रोजी 21.33 वाजता सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक पोहवा शिवाजी बनकर यांनी तक्रारदार यांचेकडून 11000 हजार रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने लोकसेवक पोहवा शिवाजी बनकर यांना ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचे विरुध्द शिरुर पोलीस स्टेशन,जिल्हा पुणे ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबध अधिनियम 1988चे कलम 7 अन्वये माझी सरकारतर्फे कायदेशिर फिंयाद आहे.

माझा वरील फिंयादी जबाब माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

दाखल अंमलदार- पो हवा शिंदे

तपासी अधिकारी- श्री. संतोष पाटील, पोलीस निरीक्षक लाप्रवि पुणे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Vinod Bhagwan Patil(I (Inspector)) / or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with OKEN Scanner

पोलीस ठाणे अंमलदार
शिरूर पोलीस स्टेशन पुणे ग्रा.

Registered by (नोंदणी अधिकारी)

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

Name (नाव): Vinod Bhagwan Pati
Rank(पद): I (Inspector)
No.(नं.):

14 Signature/Thumb impression of the complainant / informant
([illegible])

15 Date and time of dispatch to the court
([illegible])

पोलीस ठाणे अंमलदार
शिरूर पोलीस स्टेशन पुणे ग्रा



Scanned with OKEN Scanner